## प्रकरण 3
# अरुण काळे यांचा कवितेतील आविष्कारतंत्रे

प्रस्तुत प्रकरणात अरुण काळे यांच्या कवितेतील आविष्कारतंत्राचा अभ्यास करायचा आहे. अरुण काळे यांच्या कवितेतील आविष्कारतंत्रे वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहेत असे प्रथमदर्शनी असे जाणवते हा कवी स्वतंत्र जाणीव असणारा कवी असल्याचे जाणवते.

मरणाच्या आणि विनाशाच्या सानिध्याने कंपित झालेली अमानवीकरणाची जाणीव काळेंच्या 'सायरनचे शहरात'या कवितासंग्रहात अधिक परिणामकारक वाटते. महानगरात रस्त्यारस्त्यावरुन वाहणाऱ्या गर्दीत वावरत असूनदेखील वाटयाला येणारे एकाकीपण ,क्षणाक्षणाला परिस्थितीशी कराव्या लागणाऱ्या तडजोडीमूळे हरवत जाणारे अस्तित्व अशा सामाजिक पर्यावरणात गुदमरुन टाकणारे अनुभव काळयांनी मांडलेले दिसून येतात. महेंद्र भवरे म्हणतात "इथे पोटासाठी पुढे पुढे धावणाऱ्यांच्या मागे मरण लागले म्हणून प्रत्येकाच्या डोक्यावर सरण बांधलेले दिसते हे शहर धर्मांध असून माणसाच्या सुरक्षितेची कोणतीच हमी या शहरात नाही रकताचा रंग सर्वत्र सारखाच असतो. त्याप्रमाणे जातधर्म टिकवणाऱ्या सर्वांच्या जळण्याचा एकच वास आसंमतात पसरलेला आहे."[1]

क्रूर अशा अधिसत्तेच्या भयभयीत चेहऱ्याचे समाजजीवनाचे दर्शन हे 'सायरनचे शहर'मधील मुख्य केंद्र आहे. दहशतीचे दडपण आणि दुसरीकडे माणसाची भावना दुय्यम दर्जाची झाल्यामूळे रक्ताची नातीही तुटलेली दिसून येतात. जात, धर्म यांच्या नावावर निर्माण झालेली युध्दाची परिस्थिती आणि त्यात पोटासाठी आटापिटा करणाऱ्या सामान्य माणसाचे जीवन धोक्यात आलेले आहे.त्यामुळे माणसाला जगण्याची इच्छा उरलेली दिसत नाही.

*" या शहराने मला काय दिले ?*
*किंवा*
*तुम्हाला काय दिले ?*
*तुम्हाला मुलभूत गरजा आहेत*
*आणि व्हेटो वापरते हे शहर "*

(हे शहर तसे आपले नाही / सायरनचे शहर - 11 )

आतंकवादामूळे माणूस कोलमडला आहे. जुन्या शस्त्राबरोबरच आता नव्या शस्त्रांचा वापर झाल्यामूळे माणसाचे मरण अधिक जवळ आले आहे.या शहरात सुडाची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे येथे सामान्यांचे जीवन होरपळले आहे. आंतकवाद हा जात,धर्म, सत्ता आणि भूक या घटकांनी निर्माण झालेला दिसतो.

*" केव्हाही धडधडतात वेडया स्टेनगन्स*
*प्रश्नांच्या झाडांना येत नाहीत उत्तरे*
*सलग पडू लागलाय दुष्काळ*
*ओला किंवा कोरडा*
*आता पडतो गोळयांचा पाऊस*
*वाहते धारोष्ण रक्त सर्वत्र*
*माणसांची होते माती*
*माणसांचा होतो चिखल*
*पर्यावरण हे डागग्रस्त"*

(फांद्याकडून मुळाकडे जायचे झाल्यास / सायरनचे शहर - 27 )

अरुण काळे यांच्या आविष्कार विशेषांसंबंधी रणधीर शिंदे म्हणतात , " आपल्या काव्यनिर्मितीविषयी व भाषेबद्दलची काही विधाने काळे यांनी कवितेतून व्यक्त केली आहेत. कविता कागदावर उतरविणे ही खूपच अस्वस्थदायी, कष्टविणारी, दमछाक करणारी गोष्ट आहे हे कवी सूचित करतो आहे. कविता लिहीणे त्या त्या दृष्टीने अरण्यरुदन ठरत आहे. कवितारुपी चितेत तो 'स्व'ला रोज दहन करतो आहे. किंवा कवीला घ्यावी लागते रिस्क, झोपेत कविता हरवण्याची, कवितेत झोप हरवण्याची, एवढे प्रखर भान त्याला आहे. प्रेमाला हक्काची वस्ती देवून शब्दांच्या देखण्या वसाहती उभारण्याचे त्याची अभिलाषा आहे. कवितेतून नात्यांची नव्याने मांडामांड करुन नव्याने

... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

माणूस त्यांच्या कवितेत उगवत राहतो. माणसांचे आदिम गाणे आपण गात आहोत असे त्याला वाटते. भाषेतील अनेक शक्यतांचा त्याला शोध घ्यावयाचा आहे."[2] अरुण काळे एका कवितेत म्हणतात.

*'मला शोधायचा एक शब्द*
*जो भाषापंडितांना माहित नाही*
*जो सर्वांच्या रक्तातून वाहतो आहे*
*जो अजून बोलला गेला नाही.'*

( पाचांच इनकमिंग / आऊटगोईंग / नंतर आलेले लोक -18 )

सरकार आणि वृत्तपत्रे ,टीव्हीवाले हे सर्वसामान्यांच्या बाजूचे राहिलेले नाहीत. श्रीमंताच्या दिशेने वळलेली आहेत. सायरनचे शहरात निरपराध मारले गेलेले आहेत. धर्मसत्ता आणि विचारशक्ती आणि प्रवृत्ती यांना साथ देणारी आंधळी शक्ती अनेक पातळ्यांवर कार्य करीत असते.दंगलीच्या वेळी तिचा उपयोग केला जातो. ज्या महामानवाने या देशाची घटना लिहिली त्याच्याच स्मृतिदीनी बाबरी मशिद पाडली जाते हा एक नियोजित कट होता. बुध्दजयंती दिवशी स्फोट घडवून आणणे या कटाची दुसरी बाजू आहे. कधीही न विसरणारी ही जखम आहे. नक्षलवाद आणि आतंकवादाचा मुद्दा अरुण काळे यांच्या कवितेने अतिशय प्रभावीपणे मांडलेला दिसून येतो.

*' त्याच्या पुण्यस्मरणात टाकलेला खडा*
*कुणी बनवला विजयदिन*
*कुणी काळा दिन*
*त्याने पुन्हा पुन्हा सांगितले*
*धर्म माणसांसाठी आहे*
*आणि रस्त्यात उतरलीय*
*धर्मासाठी माणस'*

( 6 डिसेंबर1992 / सायरनचे शहर - 32 )

काळयांनी महानगरी वस्त्यात घडून येणारे दंगल,दहशत इत्यादी गोष्टीची मांडणी केली आहे. काळ्यांनी कवितेतून मानवता ,हिंसा, क्रूरता, शांतता ,अमानवीकरण इत्यादी गोष्टी अधिक दृगोचर केल्या आहेत. काळ्यांनी नियोजित इमारतीचे ,ओसाड जागेचे,एका नागरसंस्कृतीचे रुप कवितेतून मांडलेले दिसून येते. शहरात असणारा सततचा ताणतणाव तसेच प्रत्येकाच्या मनावर दहशतीचा दबाव असणाऱ्या घटकांचे वर्णन काळे यांनी मांडलेले आहे.

*" टोळया - समाज - संस्कृती - टोळया*
*शिथिलक्षम तटस्थ गांडुत्व*
*खुल्या खणखणायला अनुकूल तत्व*
*टोळया*
*माणसांच्या इतिहासाच्या पुनर्लेखन*
*करण्याचा धागा*
*शांततेच्या गायीनं सोडली कास*
*पण जगण्याचं नाही नाव"*

(गॅंगवर / सायरनचे शहर - 6 )

त्यामुळे आपले जीवन जगणारे, उदरनिर्वाह करणारे, सामान्याचे जीवन जगण्याचे जगही हतबल झाले आहे. एकीकडे भीती आणि दुसरीकडे माणसांत निर्माण होणारी रक्ताची नाती विस्कळीत होतात. धर्मासाठी झालेली युध्दाची परिस्थिती आणि मिळवून खाणाऱ्यांचे जीवन त्यावर उदार झालेले आहे. त्यामुळे जगण्याची भीती शहरात वाढलेली दिसते. सायरनचे शहर वाचताना दलित कवितेचे विकसित रुप आणि कवितेचे पुढचे पाऊल यांचा प्रत्यय येतो.

15928

*" गायब झाले आकाश*
*पळाले ऋतू गांडीला पाय लावून*
*दीमदमडयांच्या राज्यात*
*कवडयांनाही आले मोल*
*शहराचा केव्हाही जातो तोल "*
(टांगत्या वस्तुस्थितीबद्दल / सायरनचे शहर - 7 )

अरुण काळे यांची कविता विचार प्रकट करणारी ,समाजाची वास्तवता मांडणारी कविता आहे. आंबेडकरी विचारांची ही कविता आहे. वेगळया स्वरुपाची भावना,अनुभव यामुळे दलित कविता वेगळया दिशेने फिरताना दिसते. यांमुळे अरुण काळे यांच्या कवितेचे कविता म्हणून वेगळेपण दिसून येते. क्षमता विस्तारणारी कविता मराठीत काळे यांनी लिहिली आहे. त्यांची 'नंतर आलेले लोक' मधील कविता अधिक सूलभ, सोज्ज्वळ स्वरुपाची जाणवते. अनुभवाची मांडणी करुन, अनुभवाच्या स्वरुपाला उठाव देणे, त्या विषयीच्या अर्थाला न्याय देणे व त्यातून आपला संदर्भ शोधणे हा एक त्यांच्या कवितारुपाचा विशेष होय. कवितेतून मांडलेल्या प्रश्नांच्या विधानात्मक स्वरुपातून या जगाला काही प्रश्न ते विचारत आहेत. आपले म्हणणे वेगळया जाणिवेतून मांडत आहेत. आपल्या मनातील संशय ,शंका,मानवी स्वभाव यांचा खुलासा या प्रकारच्या तंत्रविशेषातून करतात.कधी या प्रश्नांच्या विधानातून त्यांना पाहिजे असलेली उत्तरे त्यातच असतात याची जाणीव ते वाचकांना करुन देतात. विषमता,गरीबी,दारिद्रय ,पोषण,जातीभेद यांनी सारा समाज ग्रासला आहे या वास्तवाचे स्वरुप अरुण काळे कवितेत मांडताना दिसतात.

समाजाशी एकरुपता आणि नेतृत्वात एकजिनशीपणा ठेवला तर त्याचे पद धोक्यात येते.हया चळवळीचा संदर्भ अरुण काळे यांनी मांडलेला आहे. नेतृत्व आपले स्थान टिकवत नाही.त्यामुळे त्याच्यापासून समाज दूर गेलेला असतो. कारण त्याची जगण्याची रीत बदललेली असते. म्हणून कवी अशा गोष्टीला नकार देतो. कारण लोकजीवनाशी एकरुप होवून त्याला जगायचे आहे. त्याला त्याची परंपराही मोडायची नाही.जगाच्या इतिहासात गुलामगिरीच्या विरोधात आयुष्य एक करणारी अनेक थोर पुरुष होवून गेलीत. विज्ञानक्षेत्रात सत्य

दाखवणाऱ्यांना धर्म सत्तेकडून मरण दिले गेले. या देशाच्या इतिहासात शिक्षणक्षेत्रात प्रगती करणाऱ्यांचे तसेच कला आत्मसात करणाऱ्यांचे खून करण्यात आले. मानसालाच राक्षस,दानव ठरविण्यात आले. लोकजीवनाला एक फाटा मिळाला. वर्णभेदाच्या शस्त्राने समाजाची वाचा बंद पडली . त्याचे सावट वर्तमानावरही पडले आहे. या अजब घडलेल्या सत्य घटनेची मांडणी अरुण काळे यांच्या कवितेने केले आहे. महानगरीय जीवनाचा प्रवास हा मृत्यूच्या दारी जाण्याचा मार्ग आहे. या मार्गातून आपली सुटका होण्यासाठी वेगळा मार्ग अवलंबिला पाहिजे.

*" निरभवनेचं पाण्यात घर*
*त्रिभुवन बेघर वसावे उजाड,*
*महाले पाठी बिऱ्हाड ,*
*गावित विस्थापित , राहूत*
*प्रलयांकित, मूलनिवासींचा*
*खाते-उतारा, तीन- तेरा नऊ- बारा*
*अनेकतंतील एकतेचा किराणा- भुसारा*
*सारा . . . .. सगळे उपेक्षित देशाला म्हणतात,*
*माय, माय म्हणत धुडडत .. .. ...*
*देश माती आहे की माणूस"*

( माणूस /नंतर आलेले लोक - 71 )

काळेंनी कवितेत जाणीवपूर्वक अशा Y शब्दांचा वापर केला आहे. चालू काळात मानवाचे संबंध जलदगतीने बदलत आहेत. जगण्यातील सोप्या गोष्टीचे वस्तू होत आहे. जागतिकीकरणामूळे या काळात उत्पादन,ग्राहकांना दयावी लागणारी मूल्ये या गोष्टीना खूप महत्व आलेले दिसून येते. शहरी जीवनात तसेच खेडी जीवनात विध्वंस झपाटयाने वाढत आहे. या नव्या घटनेने शहरे सुजू लागली आहेत. 'सीताराम मास्तराचं अगतिकीकरण' या कवितेतील सीताराम मास्तर गोड गळयाचा वाजंत्री ताफेवाला,सनई वाजवणारा मोठया

आदराने जगतो ,पण आधुनिक काळातील जागतिकीकरणामूळे त्यांचे आयुष्य धोक्यात आहे.

*हा सीताराम मास्तर*

*गोड गळ्याचा गायक*

*वाजंत्री ताफेवाला*

*कुणाचा मोहताज नाही झाला*

*लय सन्मानाने जगला*

*कुणाच्या दारात गाई नेल्या नाही*

*तू बी तुझ्या कविता कुणाच्या दारात*

*नेऊन बांधू नकोस*

( सीताराम मास्तराचं अगिगतीकरण/ नंतर आलेले लोक - 49 )

अशाप्रकारे काळे वर्तमानात झपाटयाने बदलत जाणाऱ्या मानवी संबंधाबद्दल अत्यंत संयमी भाषेत लिहितात. जागतिकीकरण हा शब्दप्रयोग त्यांनी जाणीवपूर्वक तोडला आहे.

अरुण काळे यांनी आधुनिक वास्तवात जात,धर्म,पंथ अशी व्यवस्था टिकून रहावी ती कशी उपयोगात आणली जाते व सामाजिक एकता नष्ट करण्यासाठी तिचा वापर केला जात आहे. याचे चित्रण कवितेतून केलेले दिसून येते.

अरुण काळे यांच्या काही दीर्घ कविता आहेत. 'माणूस एक नैसर्गिक प्रतिक्रिया' 'लहानीबाय : लार्जर दॅन लाईफ ', 'तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा', 'बारकोडींगवाल्या मुली', 'रामकिसनची इंग्लिश कुत्री' या दीर्घ कविता आहेत. कथन, विचार, स्वभाव व अनुभव या कवितेतून विशिष्ट शब्द प्रकटले आहेत.

*"पैसे फेकले की कुणशीही होतात*
*पॉझिटीव्ह ,मोर भये पनघटवर जाण्याऐवजी*
*त्या आंबलेली आंग घेऊन परताहेत*
*पहाटे उदयाचली मियाचा त्यांचा संबंध*
*तुटलाय,प्रसन्न सकाळी त्यांची गडद रात्र होतेच सुरु. . . . "*

( बारकोडींगवाल्या मुली / नंतर आलेले लोक - 52 )

काळे यांच्या कवितेत प्रतिमा व प्रतीकांचा वापर वैशिष्टपूर्णरितीने मांडलेला दिसून येतो. सुरुवातीच्या त्यांच्या कवितेत दलित कवितेत प्रतिमांचे जग अवतरताना दिसते. 'सायरनचे शहर' या कवितेत सभोवतालच्या पर्यावरणातील प्रतिमांचा वापर होऊ लागला आहे. 'नंतर आलेले लोक' मध्ये याचे विस्तारलेले रुप दिसते . अरुण काळे यांच्या कवितेत वैशिष्टपूर्णता दिसून येते. त्यांच्या कवितेतील शब्दवापरामध्ये एक प्रकारचा नवखेपणा आहे. शब्दांचे अर्थ वेगळया दृष्टीकोनातून मांडणे ,शब्दाची नवी जडण-घडण करणे,दोन वेगवेगळया भाषेतील शब्दामधून नवा शब्द तयार करणे,असे आविष्कारतंत्रे त्यांच्या कवितेत सापडतात. अरुण काळे यांची कविता सामाजिक अंतर्विरोध दर्शविणारी विचारशील स्वरुपाची आहे. त्यामूळे कवितेला तिच्या आविष्कार क्षमतेवर मर्यादा पडलेल्या दिसून येतात. त्यांच्या कवितेतील आविष्कारशैलीच्या मर्यादा स्पष्ट करताना रणधीर शिंदे म्हणतात, " अरुण काळे यांची कविता मुख्यत्वे सामाजिक अंतर्विरोध स्पष्ट करणारी, विचारशील स्वरुपाची कविता आहे. त्यामुळे स्वाभाविकच तिच्या आविष्कारशैलीवर काही एक मर्यादा पडलेल्या दिसतात. समकालातील बहुतांश कवितेची ही मर्यादा म्हणता येईल. आपल्याला काही एक विचार सांगायचा आहे, त्यामुळे अधिक परिणामकारक पध्दतीने व्यक्त करण्यासाठी काव्यरुपात विधानात्मकता,बौध्दिक चमकदारपणा, वर्णनपरता यायला लागते. वास्तवासंबंधी एखादे मुल्यात्मक विधान सिध्द करण्यासाठी तीच ती उदाहरणे किंवा प्रतिमा आवृत्त व्हायला लागतात. ही बाब अरूण काळें कवितेबाबतही घडली आहे. कवीला भावलेला, जाणवलेला, मूल्यगर्भ दृष्टिकोण अगोदरच नियत केला जातो व त्या आधारे साऱ्या जीवनाकडे पाहिले जाते.याची अनेकविध उदाहरणे काळेंच्या कवितेत आहेत. त्यामुळे एकरेशीयता येते.जीवनाकडे सामग्राने पहात सर्वांगाने दर्शन घडविणे ही गोष्ट अप्राप्य राहते. त्यामुळे काव्यरूपाला युक्तीवादाचे,तार्किकतेचे ,अर्थचमत्कृतीचे,बौध्दिक कौशल्याचे स्वरूप प्राप्त होते. या दृष्टीने खिडकी उर्फ विण्डों 2001 व 2 या कविता पहाव्यात हे जरी खरे असले तरी

अरूण काळे यांच्या कवितेने समकालीन कवितेतील आर्वतन उल्लंघिले आहे असे म्हणावे लागते. यांच्या कवितेने समकालीन कवितेतील आवर्तन उल्लंघिले आहे असे म्हणावे लागते."[3]

सायरनचे शहर हा माणसांचा दंगल युध्द स्थितीचा जमाव आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक पातळीवर दर्जा असेल तर सर्वजण या युध्दाचे बळी ठरतात. अरुण काळे यांच्या कवितेत मानवी मुल्यांचा आणि समाजरचनेचा अर्थ विचार होतो. समाजरुपी शहराला अर्थ प्राप्त होताच शहराने अनर्थाचे रुप धारण केलेले आहे म्हणून माणसाला नाकारणाऱ्या शक्तीचे प्रतीक रुप सायरनच्या शहराला प्राप्त होते. सायरनचे शहर हे जाती, धर्मानी जुळलेले व बनलेले आहे. महानगरीय कवितेने मराठी काव्यपरंपरेला नवे भान दिलेले आहे. माणसांनी गजबजलेल्या महानगरातील अनेक जाती-धर्मांचे लोक, त्यांचे वेगवेगळे आचार-विचार, विस्तृत आणि गलिच्छ वस्त्यामधील व्यवस्था, अत्याचार महानगरातील पळापळ, सहनशीलतचे जीवन कवी जेव्हा अनुभवतो तेव्हा त्यांच्या कवितेतून या महानगरीय जीवनाचा प्रत्यय येणे साहजिकच असते. महानगरात रस्त्या- रस्त्यावरुन वाढणाऱ्या गर्दीत कायम ये - जा करीत असूनही वाट्याला येणारा एकटेपणा,पावलोपावली परिस्थितीशी करावा लागणारा संघर्ष त्यामुळे हरवत जाणारे अस्तित्व, अशा सामाजिक पर्यावरणात शरीराला घाम आणणारे अनुभव या कवींनी मांडले.

अरुण काळे यांच्या कवितेत महानगरातील दंगल, दहशत आणि दडपशाही यांनी धारण केलेले तांडव रुप प्रकट होते. असुरक्षित अशा या महानगरीय जीवनात सामान्य माणूस पावलोपावली हिंसा, अत्याचार, गुंडागर्दी, अमानवीकरण, जातीवाद या गोष्टींना बळी पडतो. माणसांचे माणूसपण न जपणाऱ्या भयसूचक चेहऱ्याचे वर्णन अरुण काळे यांच्या कवितेत होते. अनेक पातळीवर घडणाऱ्या धोक्याची घंटा देणारा सायरनचा आवाज वाजतो आणि शहरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण होते. इथे काय होईल या भीतीने माणूस घाबरुन जातो. एकीकडे पोटासाठी राब-राब राबणारे, भटकंती करणारे त्यांचे दैनंदिन जीवन अस्वस्थ

झाले आहे. या अस्वस्थेमुळे माणूस खचून गेला आहे. माणसाला महानगरात एक अनोखी भीती निर्माण झालेली आहे. त्या भीतीने माणूस घराबाहेर पडत नाही. हलाखीचे जीवन जगत आहे. जगण्याचा मार्ग त्याला सापडत नाही. त्याचे जीवन पूर्णपणे विस्कळीत झालेले आहे. त्यामुळे माणूस कोलमडतो आहे. महानगरीय जीवन हे अमानुष, अत्याचारी, लाचार लोकांचे राज्य बनलेले आहे. त्यामुळे सामान्य माणसास या नगरात थारा नाही. जीवन जगणे अवघड होवून बसलेले आहे त्यामुळे माणसाचे माणूसपण, हरवत चालले आहे. अनेक माणसांची जगण्याची आशा ही संपुष्टात आलेली दिसून येते. त्यामुळे माणूस हा दुखावला आहे. जातीभेदावरुन समाजात तेढ निर्माण होत आहे. त्यामुळे माणूस अस्वस्थ झाला आहे. या भूमीवर आंबेडकरांच्या विचारांची कार्यपध्दती आहे. त्यांच्या कवितेबद्दल महेंद्र भवरे म्हणतात,

“ अरुण काळे यांच्या कवितेत सायरनचे शहरामधील माणसाचे बदलत जाणारे जीवन, संदर्भ माणूस आणि त्याचे हलाखीचे जगणे, माणूस आणि त्याचे व्यक्तिमत्व याचे विषयच वाचकापुढे ठेवले गेले आहेत. माणसाच्या मरणाचे आणि विनाशाच्या रुपाचे दर्शन त्यांच्या कवितेत घडते. माणसाची अनेक विविध रुपे स्पष्ट झालेली आहेत. माणसाचे जीवन आणि मर्यादा पूर्णपणे कवितेत परसलेला आहे.”[4]

दंगल घडवणारे स्वत: सुरक्षित राहून दंगलीचे शास्त्र घडवून आणतात. दंगल घडवणाऱ्यांच्या अंतरंगात सैतान बसलेला असतो. त्यामुळे शांततेच्या विरुध्द जातीभेदांचे युध्द पसरवीत जातात. धर्म ही आत्मचाराचा प्रमुख बनतो आणि युगेयुगे जखमांची मागणी माणसाला देतो. नोकरशाही,सावकारी,हुकूमशाही या सर्वांनीच देश बळकावला आहे. माणसाच्या मनाचा आणि भावनांचा विचार केला जात नाही. हिंसाचाराच्या गोष्टी आणि होरपळीचे वातावरण प्रकाशमय दाखविणे यासाठी ते जीवाचे रान करीत असतात. हिंसाचार घडविणाऱ्यांना प्रसार माध्यमाची भूमिका मिळत असते माणसे आणि त्यांची मने किती जुळली याचा हिशेब नसतो. अशाप्रकारे माध्यमांचे राजकारण आणि आतंकवादाचे प्रेत जाळून अरुण काळेंची कविता हादरवून सोडते.यातून सायरनचे शहरातील ही भयग्रस्त वास्तवाची सूचना

करणारी प्रतिमा अरुण काळे यांच्या कवितेने मांडलेली आहे. धर्म,समाज, राजकारण, वस्त्या, माणसे, टोळ्या, मेंढरे, गिधाडे,बुळगे, घुबडे या सर्व प्रतिमा वापरल्या आहेत. त्यातून सामर्थ्य आणि दुबळेपण, दहशत,भित्रेपणा,हिंसा,शांतता,अंधार आणि काळवंडलेपणा, अमानवीपणा आणि मानवता या गोष्टी कधी ठळक, स्पष्ट, सूचक साकार होतात. हे सायरनच्या शहरातील एक अंधकारमय जीवन माणसांच्या वाट्यातून येत आहे.याचे वर्णन अरुण काळे करतात. पारंपरिक प्रतिमांची मोडतोड करुन नाविण्यपूर्ण अर्थासह सादर करणे आणि नव्याच अर्थाची प्रतिती घडविणे हे महत्वाचे लक्षण अरुण काळे यांच्या कवितेत बघायला मिळते. त्यांच्या गिधाडाचे उज्वल भवितव्य ही कविता याचे उत्तम उदाहरण आहे.

*' गिधाडे तर राहू लागली शहरातच*
*मिळविलेत त्यांनी घटनात्मक हक्क*
*नागरी संस्कृतीचे*
*बोलताहेत मानवी हक्कांवर..*
*गिधाडे*
*आता शांतता समित्यांवर असतात*
*अन विचारपूसही करतात जखमींची*
*ओवतात सर्वांना प्रार्थनेच्या दोऱ्यात*
*पेटवून पाणी, पेटवून रक्त*
*गिधाडे स्वत:च अंकुश झालीत*
*व्यवस्थेला हाताळतात व्यवस्थित*
*किंवा काढतात मोडीत*
*गिधाडे आता काहीही होऊ शकतात*
*कबुतरांना खाऊन*
*शांततेचं प्रतीकही होऊ शकतात '*

( गिधाडाचं उज्वल भवितव्य / सायरनचे शहर - 12)

या कवितेतील गिधाडे शहरात आता सुजान नागरिक झाले आहे.शहरावर अधिराज्य गाजविणारे ही गिधाडे फॉसिस्ट प्रवृत्तीचे प्रतिक आहेत.पारंपरिक प्रतिभेला नवा अर्थ प्रदान करण्याचे कार्य अरुण काळे यांच्या कवितेचे खूप महत्वाचे लक्षण आहे. अशा प्रकारच्या प्रतिमा वापरांतून संस्कृतीसंघर्षाची रुपे सिध्द होताना दिसतात. सूक्ष्म आणि व्यापक ,स्पष्ट आणि सूचक,सरळ आणि तिरकस असे अर्थाचे अनेक स्तर या प्रतिमाविश्वाने प्रकट केले आहे.

काळे यांनी आपल्या कवितेतून वास्तवाविषयी असणारी प्रतिक्रिया व्यक्त केलेली दिसून येते. ‘सायरनचे शहर’ या काव्यसंग्रहातील महानगरीय जीवन हे एक मनाला हादरवून टाकणारी असे आहे. काळे यांनी अनेक आविष्कारतंत्रे आपल्या कवितेतून घेतलेली दिसून येतात. महानगरीय जीवन हे एक नरक आहे. या नरकात वावरताना जीव मुठीत घेऊन वागावे लागते. मरणे आणि जगणे या महानगरीय जीवनातील दोन बाजू निर्माण झालेल्या दिसून येतात. त्यामुळे काळेंनी आपल्या कवितेतून एक भयकारी जीवनाची स्थिती निर्माण झालेली दाखवली आहे. काळे म्हणतात महानगरीय जीवन हे आत्म्याला न मिळणाऱ्या शांतीचे प्रतीक आहे. त्यामुळे त्याला इथल्या दुबळ्या घटकांची जाणीव आहे. तसेच इथल्या महानगरीय संस्कृतीचे त्यांना भान आहे. क्षणाक्षणाला परिस्थितीशी सामोरे जावे लागते. तसेच अनेक तडजोडीतून मार्ग काढावा लागतो. त्यामुळे त्या जीवनात आपले स्वप्न भंग पावत असते. सभोवताली पावलोपावली निर्माण होणारा संघर्ष, हिंसाचार यातून मार्ग काढणे हे अवघड असल्याचे दिसून येते. त्यामुळे माणसाला वास्तवाशी असणारे नाते हे टिकणारे नाही. माणूस हा सर्वशून्य झालेला आहे हे वैशिष्ट्य दिसते.

महानगरात परिस्थितीशी माणूस अस्वस्थ झालेला दिसून येतो. महानगरीय व्यवस्थेत शिकार झालेला, त्यांचे खाद्यान्न बनलेला सामान्य माणसाच्या दारिद्र्य आणि गरीबीचे चित्रण अरुण काळे प्रभावीपणे मांडताना दिसतात. अरुण काळे यांनी महानगरीय जीवनातील एक

दिशाहीन परिस्थिती निर्माण झालेली दाखवून दिलेली आहे. तशातच माणसाच्या जगण्याचा वाटा वेगळ्या झालेल्या दिसून येतात. महानगरातील जीवन हे संघर्षात्मक असते. काळे म्हणतात महानगरातील सामान्य माणसांविषयी मनात असणारी तळमळीची, कळकळीची भावना आपल्या कवितेतून प्रकट करतात. काळेंना महानगरीत चारी बाजूंनी विद्रोह दिसून येतो. गरीब, दरीद्री सामान्य माणूस भाजून निघालेला आहे. त्या माणसांवरती येणाऱ्या अनुभवांचे चित्रण काळेंनी एक माणूसकीच्या नात्यातून आपल्या कवितेतून केलेले दिसून येते. काळे महानगरीय जीवन हे सत्ता, राजकारणी, लोभी लोकांचे राज्य आहे असे दर्शवतो. त्यामुळे अरुण काळे महानगरीय जाणिवांच्या संदर्भाना काही जीवनदायी, प्रेमदायी प्रेरणेचा वेध घेतात असे दिसून येते.

एकंदरीत अरुण काळे यांच्या कवितेतील प्रतिमाविश्व आणि भाषेविषयी विवेचन करताना महेंद्र भवरे म्हणतात -" 1980 नंतरच्या दलित कवितेने मात्र जाणीवपूर्वक नव्या वाटा चोखाळल्या आहेत. नव्या वाटेवरील या कवितेचा प्रवासही जबाबदारीने आणि काळजीपूर्वक झालेला दिसतो, सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे या कवितेने लिंगवादी शब्दांना, आक्रस्ताळेपणा आणि गुळगुळीत प्रतिमांना सपशेल नाकारले, भाषिक रुपांना नवीन अर्थछटा प्राप्त करुन देण्यासाठी रुढ झालेली प्रमाणके मोडणे आवश्यक आहे. याचे भान कवितेला आहे. म्हणून भाषेच्या विविध छटा या कवितेत दिसतात. नव्या शब्दकळांचे मोठे विश्वच या कवितेने उभे केले आहे. भाषा संकेतांना समूहजीवनाचे चिन्हसंकेत बनविण्याचे मोठे कार्य या कवितेने केले आहे. चिंतनगर्भता, प्रतिकात्मकता, अर्थाची व्यामिश्रता, अनेकार्थता, मिथ्स्चा समर्पक वापर, पारंपरिक प्रतिमांना नवे अर्थ प्रदान करणे, प्रतिमांची मोडतोड करुन नाविन्यपूर्ण अर्थासह साकार करणे अशा अनेकविध गुणवैशिष्ट्यांनी समकालीन दलित कविता साकार झाली आहे. वापरुन गुळगुळीत झालेल्या प्रतिमांना नाकारुन ही कविता नवीन अर्थासह साकार होते.महत्वाचा विशेष म्हणूनही सांगता येईल."[5] भवरेंनी सांगितलेले हे सर्व विशेष अरुण काळेंच्या कवितेला जसेच्या तसे लागू पडतात. अरुण काळे यांच्या कवितेत

मानवी जीवन आणि समाज या विषयांचे चिंतन प्रामुख्याने प्रकट झाले आहे. दलित,आदिवासी,सर्वहारा यांच्या जगण्याचे जगण्यातील अंतर्विरोधाचे आणि आहेरे-नाहीरे च्या जगातील अंतराचे दर्शन या कवितेतून ठळकपणे प्रकट झाले आहे. पूर्वसूरीच्या दलित कवितेचा प्रांत ओलांडून नवेनवे प्रांत या कवितेने पादाक्रांत केले आहेत असे म्हणणे संयुक्तिक ठरते.

## प्रकरणाचा सांराश

या प्रकरणामध्ये अरुण काळे यांच्या कवितेतील आविष्कारतंत्राचा विचार केलेला आहे. रॉकगार्डन,सायरनचे शहर,नंतर आलेले लोक या काव्यसंग्रहाच्या आधारे कवितेतील आविष्कारतंत्रांचा स्वतंत्रपणे विचार केलेले आहे.

अरुण काळे यांच्या कवितेतील आविष्कारतंत्रे वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मरण आणि विनाश ही जाणीव 'सायरनचे शहर' या कवितासंग्रहात परिणामकारक वाटते. महानगरातील रस्त्यांवरील गर्दी असताना देखील वाट्याला येणारा एकटेपणा, क्षणाक्षणाला परिस्थितीशी सामोरे जाण्यासाठी करावी लागणारी धडपड, वातावरणात गुदमरुन टाकणारे अनुभव काळे यांनी मांडलेले आहेत. भीतीचे दडपड,आणि दुसरीकडे माणसाची भावना वळलेली दिसते. त्यामुळे रक्ताची नाती तुटलेली दिसतात. जात,धर्म यासाठी निर्माण होणारा वाद तसेच पोटासाठी धडपडणाऱ्या सामान्य वर्गाचे जीवन धोक्यात आहे. त्यामुळे माणसाला जगणे अशक्य झाले आहे.

आतंकवाद हा माणसाच्या मनाला छेदून जाणारा घटक बनलेला दिसतो.त्यामुळे माणूस कोलमडला आहे. शस्त्रांचा वापर अधिक प्रमाणात झाल्यामुळे माणसाचे मरणे हे निकट आलेले दिसते. त्यामुळे सामान्य माणसाचे जीवन विस्कळले आहे. सामान्य माणसाच्या बाजूने कोणी राहिलेला नाही. त्यामुळे सामान्य माणूस हा दुखावलेला आहे.

काळे यांनी नियोजीत इमारतीचे,ओसाड जागेचे,एका नागरसंस्कृतीचे रुप कवितेतून मांडलेले आहे. तसेच काळे यांनी शहरातील तणाव,भीती,दबाव,या घटकांचे वर्णन केलेले दिसते. तसेच काळे यांनी 'नंतर आलेले लोक' या कवितासंग्रहातील कवितेच्या आविष्कारतंत्राचा व्यवस्थीतरित्या वापर केलेला दिसतो. अरुण काळे यांनी आपल्या कवितेतील आविष्कारतंत्रे शोधून आणि प्रभावी प्रतिमांचा वापर करून कवितेची मांडणी केलेली आहे.

पुढील प्रकरणात आपणांस अरुण काळे यांच्या कवितेची भाषा आणि शैली यांचा विचार करावयाचा आहे.

## संदर्भ

1. महेंद्र भवरे, *दलित कवितेतील नवे प्रवाह*, श्रीरामपूर, शब्दालय प्रकाशन, पहिली आवृत्ती, फेब्रु. 2001, पृ. 27
2. रणधीर शिंदे, *अरुण काळे कविता: काही आविष्कार विशेष* ,नवाक्षर दर्शन,वर्ष 4 , अंक 3-4- एप्रिल सप्टे.2008 पृ.41
3. रणधीर शिंदे ' *अरुण काळे कविता: काही आविष्कार विशेष* ,नवाक्षर दर्शन,वर्ष 4 , अंक 3-4- एप्रिल सप्टे.2008 पृ.45
4. महेंद्र भवरे, *दलित कवितेतील नवे प्रवाह*, उ नि.पृ. 121
5. महेंद्र भवरे, *दलित कवितेतील नवे प्रवाह*,उ.नि.पृ. 22 - 23